# *वार्तापत्र*

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- २४/०३/२०१८

## *<u>एक नक्षलवादी ताब्यात</u>*

उपविभाग कुरखेडा अंतर्गत येणाऱ्या पोमके कोटगुल येथे दिनांक २३/०३/२०१८ रोजी भरलेल्या आठवडी बाजारात गोपनिय सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अभियान राबवत कोटगुल येथील अधिकारी व कर्मचारी यांनी एका संशयीत इसमास ताब्यात घेतले.

सदर इसमाची झाडा-झडती घेतली असता त्याच्याकडे ०१ पिस्टल व ०१ रिमोट मिळुन आला. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने त्याचे नाव चंदु ऊर्फ बारीकराव दलसु हिचामी वय-२१ वर्ष असल्याचे सांगुन तो माओवादयांच्या कंपनी ०४ मध्ये सदस्य पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. तसेच त्याने घातपाताच्या दृष्टीने कोटगुल येथील बाजारात दोन ठिकाणी भुसुरूंग पेरून ठेवल्याची माहिती दिली.

मिळालेल्या माहितीवरून बॉम्ब शोधक पथक गडचिरोली यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी आरोपीने सांगितल्याप्रमाणे दोन ठिकाणी नक्षल्यांनी पेरून ठेवलेले भुसुरुंग शोधून निकामी केले.

पोलीस अटक केलेल्या माओवादयाची सखोल चौकशी करत आहेत.